# मराठी युवकभारती

वेळ : ३ तास | मार्च - २००८ | एकूण गुण : ८०

**प्रश्न १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा:** (१०)

(१) मराठी असे आमुची मायबोली

(२) अंतराळवीराचे मनोगत

(३) आजचा तरूण आणि व्यसनाधीनता

(४) भारतीय शेतीपुढील आव्हाने

(५) सूर्य उगवला नाही तर...

**प्रश्न २. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा:** (८)

(१) फुलांची सर्जनशीलता लेखिका दुर्गा भागवत यांनी कशी पटवून दिली आहे?

(२) 'स्त्री-पुरुष समानता' हे मूल्य पाश्चिमात्त्यांनी कसे जोपासले आहे?

(३) महात्मा फुले यांच्या डोक्यात कोणकोणते विचार उसळले होते?

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा:** (८)

(१) श्रीराजे शंभुछत्रपती यांनी अमात्यांना पत्रातून कोणकोणत्या आज्ञा केल्या आहेत?

(२) 'टारफुला' या पाठातील दादा पाटलांनी केरूनानांच्या मळ्यात काय पाहिले?

(३) डॉ. फ्लेमिंग यांनी तोतया यानाबाबत कोणते दोन पर्याय सुचविले?

(४) स्मॉल कॉज कोर्टात मातोसरींना कोणता अनुभव आला?

**प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा:** (८)

(१) कर्मकांड आणि भक्तीचे बाह्य प्रदर्शन करणाऱ्यांचे ढोंग शाहीर रामजोशी यांनी कसे उघडे पाडले आहे?

(२) कोणत्या कारणांमुळे आपण कवी झालो, असे दिलीष पुरुषोत्तम चित्रे म्हणतात?

(३) जुन्या व नव्या पिढीच्या बालपणांतील कोणते महत्त्वाचे बदल कवी दासू वैद्य यांनी टिपले आहेत?

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा:** (४)

(१) संत नरहरी सोनार यांनी गुरुकृपेची महती कोणकोणत्या दृष्टांतांद्वारे पटवून दिली आहे?

(२) 'बीन कठीण फिरत घेते' असे कवी बा. भ. बोरकर का म्हणतात?

(३) कवयित्री अनुराधा पाटील मुलीला कोणता जीवनविषयक दृष्टिकोन देतात?

**प्रश्न ६. (क) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्यातील आशयसौंदर्य स्पष्ट करा:** (४)

(१) घेयागा वासना तऱ्हीं उरैल ।। (२) ''माझे धैर्य कदापि खचणार नाही.''

(३) निसर्गसौंदर्याचं वेड जगण्याला ऊर्मी देतं.

**(ख) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा:** (४)

(१) ऊंस किरु दिसे काळा ।

(२) फुलबाग मला हाय पारखा झाला ।
परि घेपे रसाचा गळाळा ।।
सागरा, प्राण तळमळला ।।

(३) सांगा सांगा हो, उत्तर । अजुनी ना शून्याकार,
मग लावा अट्केपार । चीड-झेंडे ।।

**(ग) (१) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा:** (२)

(१) रॉबर्टला कोणत्या कलेची जाण होती?

(२) [illegible]

(३) लेखक लक्ष्मण माने 'आभाळाएवढा छत्रपती' कोणास म्हणतात?

(४) रजिया पटेल यांच्या वडिलांचे वर्णन त्यांचे विद्यार्थी कोणत्या शब्दांत करीत?

**(२) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा:** (२)

(१) कवी अनिल यांना कशाचे ओझे झाले आहे?

(२) कवी वसंत सावंत यांनी 'हिरवी गौळण' कोणास म्हटले आहे?

(३) 'झाड आणि माणूस' या कवितेतील झाडांच्या मनात कोण असतात?

(४) कवी नामदेव ढसाळ आपल्या पूर्वजांना 'धन्य' का म्हणतात?

**प्रश्न ७. (क) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १०० शब्दांत लिहा:** (६)

(१) विजया राजाध्यक्ष यांच्या कथेतील नर्मदा कोणत्या कारणामुळे अस्वस्थ होती?

(२) 'ऊन' या कथेतील पिराजीच्या घरची परिस्थिती कशा प्रकारची होती?

(३) 'स्पर्श' या कथेतील बुवाचे डोळे केव्हा व कसे उघडले?

**(ख) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ६० शब्दांत लिहा:** (४)

(१) 'त्याग' या कथेतील कथानायिकेचे मन कोणकोणत्या विचारांनी हादरून गेले?

(२) स्वैपाकाच्या बाई राजा कुत्र्याशी कशा प्रकारे वागत?

(३) 'ती गावची वाघीण हाय. तिची वाटच वेगळी हाय!' असे म्हातारा का म्हणतो?

**प्र. ८. (१) खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा:** (२)

(१) व्यतिरेक (२) अतिशयोक्ती

**(२) कंसांतील सूचनेनुसार कोणत्याही दोन वाक्यांचे रूपांतर करा:** (२)

(१) तुम्ही जवळ असलात की विश्रांतीच असते. ( *केवल वाक्य करा* )

(२) पंचगंगेचा पूल ओलांडून आम्ही पुढे निघालो. ( *संयुक्त वाक्य करा* )

(३) मला उशीर लागला तर मात्र जोडी घेऊन वापस ये. ( *वाक्यप्रकार ओळखा* )

**(३) खालीलपैकी कोणत्याही चार पारिभाषिक शब्दांचे अर्थ लिहा:** (२)

(१) Audit (२) In-charge (३) Report (४) Summary (५) Vacancy (६) X-ray

**(४) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार शुद्ध करून लिहा:** (२)

(१) माझे वडील आणी चार काका या सर्वांचं मिळून हे एक कूटुंब.

(२) हि बांधा-पाडा योजना पाहुन लोक महाराजांना हसत असत.

किंवा

**खालीलपैकी कोणत्याही एका वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा:**

(१) ''लेकीला मोट मारायला शिकीवलं काय केरूनाना तुम्ही

(२) 'आलो ... आलो' त्याने तशाच आवाजात प्रतिसाद दिला

**(५) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वत:च्या वाक्यांत उपयोग करा:** (२)

(१) मात करणे (२) हृदयाचा बांध फुटणे

(३) पाळत ठेवणे (४) जीव की प्राण असणे

**प्रश्न ९. (क) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा:** (५)

(१) खंडित झालेला पाणीपुरवठा नियमित सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यास पत्र लिहा.

(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा: (३)

सामाजिक जीवनाची पुनघर्टना करण्याचे प्रचंड कार्य आज पुढारलेल्या देशांत चाललेले आहे. या पुनर्घटनेत ज्या अनेक साधनांचा उपयोग केला जात आहे त्यात वाङमयाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वाङमय हे निव्वळ मनोरंजनाचे किंवा विश्रांतीच्या वेळी मनोविनोदाचे एक साधन नसून वाङमय हे सामाजिक पुनर्घटनेचे एक प्रभावी शस्त्र आहे. वाङमयाने समाजाचे जीवन घडविता येते. समाजाची ध्येये, आकांक्षा व भावना बदलता येतात, इतकेच काय पण वाङमयाने समाजाचा आत्मा बदलता येतो. म्हणूनच स्टॅलिनने 'लेखक हे आत्म्याचे शिल्पकार आहेत' असे म्हटले आहे. वाङयसेवक हे समाजसेवकच असले पाहिजेत. मुत्सद्दी, योद्धे, कायदेपंडित, वैद्य, स्थापत्यशास्त्रज्ञ, शेतकरी, मजूर यांच्याइतकीच समाजसंवर्धनाची जबाबदारी साहित्यिकांवरही आहे.

'ललित वाङमय' - प्र. के. अत्रे

प्रश्न : (१) पुढारलेल्या देशात कोणते कार्य चाललेले आहे असे लेखक म्हणतात? (१)

(२) स्टॅलिनने लेखकांचा गौरव कोणत्या शब्दांत केला आहे? (१)

(३) साहित्यिकांवर कोणती जबाबदारी आहे? (१)

किंवा

वरील गद्य उताऱ्याचा सुमारे एक-तृतीयांश (१/३) एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

(ग) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निमंत्रणपत्रिका लिहा : (३)

(१) दि. १२ जानेवारी, 'राष्ट्रीय युवा दिना' निमित्त आयोजित, युवा महोत्सवाचा उद्घाटन समारंभ.

(२) महाविद्यालयात आयोजित केलेले कविसंमेलन.

किंवा

खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कार्यक्रमपत्रिका तयार करा:

(१) महाविद्यालयातील राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा सत्कार समारंभ.

(२) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील नियतकालिकाचा प्रकाशन सोहळा.

किंवा

खालील विषयावर वर्तमानपत्रासाठी वृत्तांत लिहा:

तुमच्या महाविद्यालयातील रक्तदान शिबिर.

❖ ❖ ❖